चुकामधून शिकणे हे प्रगतीचे चिन्ह आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH संपादक:राहुल मारोतीराव वाईकर कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | मंगळवार १० जून २०२५ | अंक १७६ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु






# मंदिरापासून स्मशानापर्यंत सर्वांचा समान अधिकार

## जातीय विषमतेपासून मुक्त व्हा

"राष्ट्राप्रती आपली जबाबदारी ओळखणारा समाजा असावा. पर्यावरणाला अनुकूल जीवन शैली स्वीकारली पाहिजे. जातीय विषमतेपासून मुक्त व्हा. मंदिर, जलाशय आणि स्मशान अशा सार्वजनिक स्त्रोतांवर संपूर्ण समजाचा अधिकार असला पाहिजे. हीच खरी सामाजिक समरसता आहे" असे विचार मोहन भागवत यांनी व्यक्त केले.

"समाजाने जातीय भेदभाव मागे सोडून एका समरस सर्वसमावेशक राष्ट्राच्या दिशेने अग्रेसर झालं पाहिजे. संघाच कार्य व्यक्ती निर्माणाच आहे. व्यक्ती निर्माणातून कुटुंब, समाज, राष्ट्र आणि संपूर्ण मानवतेप्रती उत्तदायित्वाची भावना जागृत होते" असं राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (RSS) सरसंघचालक मोहन भागवत रविवार स्वयंसेवकांशी संवाद साधताना म्हणाले. मोहन भागवत यांनी स्वयंसेवकांकडून त्यांच्या भागात सुरु असलेल्या शाखा आणि सेवा कार्याची माहिती घेतली. "ज्या भागात शाखा आहे, त्या भागातील प्रत्येक कुटुंबाशी संघाचा संपर्क असला पाहिजे" असं मोहन भागवत म्हणाले. "आपण 'वसुधैव कुटुम्बकम्'- विश्व एक परिवार आहे असं म्हणतो, याच भावनेतून संघाने आपल्या कार्याचा विस्तार समाज जीवनच्या विभिन्न क्षेत्रात केला आहे" असं मोहन भागवत म्हणाले.

"देशभरात लाखो सेवा कार्य संघ कार्यकर्ते आणि समाजाच्या सहकार्याने सुरु आहेत. जे समाजातील सकारात्मक परिवर्तनाच उदहारण आहे. वर्तमानात संघाने शताब्दी वर्षात प्रवेश केला आहे. 'पंच परिवर्तना'च्या सिद्धांतावर कार्य करताना समाजाला जागरूक, उत्तरदायी आणि संवेदनशील बनवण्याच्या दिशेने अग्रेसर आहे" असं सरसंघचालकांनी सांगितलं.

# नायगांव ते इस्थळ रस्त्याची झाली चाळणी प्रवाशी त्रस्त रखडलेल्या रस्ते कामासाठी ग्रामस्थ उपोषणाच्या पवित्र्यात

केज : तालुक्यातील अनेक रस्त्यांची सुधारणा होत असताना काही रस्त्यांची मात्र, दुरवस्था झाली आहे. तर काही ठिकाणी होणारी कामे ही असून खोळंबा अशी झाली आहेत. याबाबत अधिक वृत्त असे की,तालुक्यातील मौजे नायगांव ते इस्थळ या रस्त्याची पूर्णतः चाळणी झालेली असून त्याची अत्यंत दुरवस्था झालेली आहे.त्यात नायगाव ते सौंदना या



गावांना जोडणाऱ्या रस्त्याचे काम अनेक महिन्यांपासून रखडलेले आहे.गुत्तेदराने त्या रस्त्याचे बी.बी.एम पर्यंतचे काम करून सोडून दिले आहे. काही ठिकाणी तर काम होण्याअगोदरच गुडघाभर खड्डे पडले आहेत.बी.बी.एम करून सोडल्याने रस्त्यावरील खडे उघडले पडल्याने प्रवास करताना शरीराची चांगलीच वाट लागत आहे. तसेच सौंदना ते इस्थळ हा रस्ता म्हणजे खड्यात रस्ता की रस्त्यात खड्डा अशी अवस्था झाली आहे. अनेक वर्षापासून हा रस्ता याच अवस्थेत आहे.या खड्डेमय रस्त्यावरून जाताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. नायगाव ते इस्थळ या रस्त्याचे काम तात्काळ पूर्ण न झाल्यास रस्त्याच्या रखडलेल्या कामासाठी सौंदना,नायगाव येथील ग्रामस्थ उपोषणाच्या पवित्र्यात असल्याचे ग्रामस्थांनी बोलताना सांगितले.

# शैक्षणिक क्षेत्रातील गुणवंत विद्यार्थी शिक्षक आणि उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शाळांचा आमदार श्री पुरस्कार देऊन गौरव करणार -आ.सुरेश धस



आष्टी । प्रतिनिधी जगातील वेगवान घडामोडी अभ्यास आणि नवनवीन आव्हाने पेलण्यासाठी आर्टि फिशियल इंट `लिजन्स, कृत्रिम बुद्धिमत्तेचा शैक्षणिक परिणाम लक्षात घेऊन अभ्यास करावा आणि आपले भवितव्य घडवावे असे मत आ.सुरेश धस यांनी व्यक्त केले. आष्टी येथे अनिशा इंटरनॅशनल स्कूल येथील प्रांगणात तालुक्यातील माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांच्या गुणगौरव समारंभ सोहळ्या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून वन विभागामध्ये अधिकारी पदावर नियुक्त झालेल्या अश्विनी परकाळे जरेवाडी पॅटर्नचे संदीप पवार, गटनेते खंडू जाधव,श्रीहरी गीते,जयशिंग गव्हाणे,मा.सरपंच अनिल ढोबळे,विस्तार अधिकारी मनोरंजन धस,चेअरमन मारुती पठाडे,महेश शिंदे,रावसाहेब शिरसाठ आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी मनोगत व्यक्त करताना आष्टी, पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील गुणवंत विद्यार्थी त्यांना घडवणारे शिक्षक आणि उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शाळा यांना आगामी वर्षापासून आमदार श्री पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे अशी घोषणा आमदार सुरेश धस यांनी केली. उत्कृष्ट काम करणाऱ्या शाळांसाठी आमदार चषक स्पर्धा सुरू करणार ज्यामुळे गुणवत्तेसाठी स्पर्धा सुरू होईल गुणवंत विद्यार्थी हे देशाचे आधारस्तंभ आहेत त्यांनी वेगवेगळ्या क्षेत्रात जाऊन स्वतःचे आई वडिलांचे शाळेचे व आपल्या तालुक्याचे नाव उज्वल करावे. आष्टी तालुका हा गुणवंतांची खाण आहे. यूपीएससी परीक्षेत मतदार संघातील चार विद्यार्थी आयएएस व आयएफएस म्हणून निवडले गेले आहेत.आणि या वर्षीच्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कारातून पुढील विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी यासाठी या गुण गौरव समारंभाचे आयोजन केले आहे असे प्रतिपादन करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे भारत हा विश्व गुरु व्हावा यासाठी प्रयत्न सुरू असून त्यासाठी संशोधन क्षेत्रामध्ये विद्यार्थ्यांनी लक्ष केंद्रित करावे त्याचबरोबर आर्थिक क्षेत्रात प्रगती करण्यासाठी त्याही क्षेत्राचा अभ्यास करण्याची आवश्यकता

# महायुती सरकारच्या फसव्या योजना जनतेसमोर उघड करा - आ. कैलास पाटील

बीड ( प्रतिनिधी ) - शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे कळंब धाराशिव चे आमदार मा. कैलास पाटील यांनी आज जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या संपर्क कार्यालयास भेट दिली. महायुती सरकारच्या निवडणुकी पूर्वी दिलेल्या फसव्या योजना, आश्वासने या विरोधात मक्या हुवा तेरा वादाफ या अनोख्या आंदोलना विषयी चर्चा केली. महायुती सरकार स्थापने पूर्वी ज्या फसव्या योजना, आश्वासने जाहीर केली ती प्रखरतेने जनतेसमोर मांडा, गाव तांडा वस्ती वर जाऊन या सरकारचा खरा चेहरा जनतेला दाखवा असे आमदार कैलास पाटील म्हणाले. यावेळी त्यांनी



शिवसैनिकांशी संवाद साधला.

यावेळी त्यांचा सत्कार जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी केला, सोबत उपजिल्हाप्रमुख हनुमंत जगताप, राजु माहुवाले, सुशील पिंगळे, रवी वाघमारे, युवासेनेचे बबलु दिवे, नवनाथ प्रभाळे, प्रदीप कोटुळे, पंकज कुटे, गणेश लोणकर, सतीश परदेशीं, मारुती वाघचौरे अक्षय काशीद, रंगनाथ पैठणकर, नंदकुमार घोगरे, विशाल तांबे सह आदी शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉ.योगेश क्षीरसागर यांनी घेतले प.पू.पंडित प्रदीप मिश्रा यांचे दर्शन



बीड (प्रतिनिधी)दि.९ : विसाव्या शतकातील म हान संत श्री ज्ञानेश्वर म ऊली महाराज यांच्या रौप्य महोत्सवानिमित्त बीड तालुक्यातील चाकरवाडी येथे सुरु झालेल्या अखंड हरिनाम सप्ताहात आंतरराष्ट्रीय ख्यातिप्राप्त कथा प्रवक्ते प.पू.पंडित प्रदीप मिश्रा यांच्या शिवपुराण कथेला उत्साहात सुरुवात झाली आहे. त्यांचे कथेच्या दुसऱ्या दिवशी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दर्शन घेतले.कथेच्या सुरुवातीला ह.भ.प. महादेव महाराज चाकरवाडीकर यांच्या उपस्थितीत पूजा पार पडली. त्यांचे देखील आशीर्वाद घेऊन डॉ.योगेश क्षीरसागर यांनी कथा श्रवण केली. यावेळी डॉ.क्षीरसागर यांच्यासह भाजपचे नेते नंदकिशोर मुंदडा, डॉ.दिपाताई क्षीरसागर, संतोष सोहनी, शुभम धूत यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. हरिनाम सप्ताहाच्या निमित्ताने भाविकांमध्ये भक्तिभावाचे वातावरण असून, परिसरात अध्यात्मिक ऊर्जा अनुभवता येत आहे.

# ग्रामपंचायत अधिकारी युनियन च्या प्रलंबीत सेवा विषयक प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी आदित्य जिवने यांना निवेदन

बीड जिल्हयातील ग्रामपंचायत अधिकारी संवर्गाच्या प्रलंबीत सेवा विषयक प्रश्नाची सोडवणुक करण्यासाठी जिल्हा परिषद बीड चे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने यांची बीड जिल्हा ग्रामपंचायत अधिकारी युनियन पदाधिकारी यांनी मागण्यांचे निवेदन देऊन विनंती केली. यामध्ये ग्रामपंचायत अधिकारी संवर्गातुन विस्तार अधिकारी पदोन्नती , १ नोव्हेंबर २००५ पूर्वीची जाहिरात व अधिसुचना परंतु प्रत्यक्ष सेवेत २००५ नंतर सेवेत



आलेल्या ग्रामपंचायत अधिकारी यांना जुनी पेन्शन योजना लागु करणे ,१०, २० व ३० अश्वासित प्रगती योजनेचा लाभ मंजुर करणे , छझड च्या मिसींग रक्कमा ग्रामपंचायत अधिकारी यांच्या छझड खाती जमा करणे ,निलंबीत ग्रामपंचायत अधिकारी यांना सेवेत बहाल करणे इत्यादी प्रलंबीत सेवा विषयक बाबी सोडविण्यासाठी निवेदन देण्यात आले. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांनी सदरील प्रलंबीत विषय तात्काळ मार्गी लावण्याचे संघटना पदाधिकारी यांना आश्वासीत केले

# चालत्या एसटी बसने घेतला पेट



केज। प्रतिनिधी केज कडून कळंबकडे जाणारी प्रवाशांनी भरलेल्या बसने अचानक आज (दि.९) सोमवार रोजी दुपारी ३ च्या सुमारास पेट घेतला. मात्र या अपघातात चालक आणि वाहकाच्या प्रसंगाधावनतेमुळे पुढील अनर्थ टळलेला आहे. अधिक माहिती अशी कि, कळंब आगाराची केज कळंब (एम एच- ११/बी एल- ९३७५) या क्रमांकाची एसटी बस केज कडून कळंबकडे जात असताना केज ते साळेगाव दरम्यान चिंचोली पाटी जवळ असलेल्या शेख फरीदबाबा दर्ग्या जवळ बसच्या बोनेटने अचानक पेट घेतला. अचानक पेट घेतल्याने प्रसंगावधान राखून एसटी बस चालक अनिल बारकुल आणि वाहक भांगे यांनी बस रस्त्याच्या बाजूला घेतली. तोपर्यंत प्रचंड आग लागलेली होती. परंतु चालक आणि वाहक यांनी प्रसंगावधान राखत त्यांनी प्रवाशांना सुखरूप खाली उतरविले. यामुळे पुढील अनर्थ टळला. त्यानंतर अग्निशामक दलाची गाडी घटनास्थळी हजर झाली परंतु तो पर्यंत पूर्ण एसटी जळून खाक झालेली होती. या अपघातात तीन ते चार प्रवासी हे किरकोळ जखमी झालेले आहेत

# लाभार्थी घरकुल धारकांना शासनाकडून मिळणारी पाच ब्रास मोफत वाळू एक सोबत पुरवा -सुनील कुटे

बीड । प्रतिनिधी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्देशानुसार गेली अनेक वर्षे प्रलंबित असलेल्या घरकुल लाभार्थ्यांना ५ ब्रासपर्यंत मोफत वाळू उपलब्ध करून देण्याच्या धोरणाची अंमलबजावणी करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यानुसार बीड मध्ये मोफत वाळू वितरित केली जात आहे. मात्र एक किंवा दोन ब्रास क्षमतेने ही वाळू लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवली जात आहे. यामुळे घरकुल लाभार्थ्यांना वाहन भाड्या अभावी आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. तेव्हा लाभार्थ्यांना एक सोबत पाच ब्रास वाळू



पुरवण्यात यावी अशी मागणी शिवसंग्राम चे युवक जिल्हाध्यक्ष सुनील कुटे यांनी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी, तहसीलदार यांच्याकडे केले आहे. जिल्ह्यात ८० हजार घरांच्या उद्दीष्टापैकी ७९ हजारांवर घरकुलांना मंजूरी देण्यात आली असून दिवाळीला ५० हजार कुटूंबे नव्या घरात राहायला जातील या उद्दिष्टाने प्रशासन काम करत आहे. वाळू अभावी घरांच्या बांधकामाला गती मिळत नसल्याने राज्य सरकारने घरकुल धारकांना ५ ब्रास वाळू मोफत देण्याच्या धोरणानुसार बीड मध्ये घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळू वाटप कार्यक्रमाचा शुभारंभ वाळूचे प्रत्यक्षात ट्रैकर भरून देऊन करण्यात आला. या निर्णयामुळे घरकुलाच्या कामांना आता गती मिळणार

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार १० जून २०२५
https://lokaarambh.com



# संपादकीय

## बालगुन्हेगारीः मानसिक स्थिती आणि विकृती..

आजकाल लहान मुले आणि तरुण पिढीमध्ये गुन्हेगारीची वाढती प्रवृत्ती, अवैध शस्त्रांची सहज उपलब्धता आणि अमली पदार्थांचे वाढते व्यसन ही एक गंभीर सामाजिक समस्या बनली आहे. या प्रश्नांची सखोल माहिती घेणे, त्यांची कारणे समजून घेणे आणि त्यावर प्रभावी उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे आहे. लहान मुलांची मानसिकता, त्यातील विकृती आणि भावनिक अस्थिरता हाही एक महत्त्वाचा मुद्दा आहे. तरी या लेखातून आपण यामागील कारणे, उपाययोजना यावर प्रकाश झोत टाकणार आहोत. भावनिक अस्थिरता आणि मानसिक विकृती : हा एक लक्षात घेण्यासाठी महत्त्वाचा मुद्दा आहे. काहीवेळा भावनिक अस्थिरता, मानसिक आजार किंवा व्यक्तिमत्त्व विकृती यांमुळे व्यक्ती हिंसक होऊ शकते आणि शस्त्रांचा वापर करू शकते. समूह मानसिकता टोळी किंवा गटाचा भाग असताना, गटाच्या दबावाखाली किंवा गटाची निष्ठा सिद्ध करण्यासाठी तरुण हिंसक कृत्ये करण्यास तयार होतात. सहानुभूतीचा अभाव इतरांच्या भावना आणि वेदनांची जाणीव नसणे किंवा त्याकडे दुर्लक्ष करणे, कोणाचीही दया न येणे, कसलीच तमा न वाटणे हे हिंसक वर्तनाचे एक महत्त्वाचे कारण आहे. हिंसक चित्रपट, व्हीडिओ गेम्स आणि सोशल मीडियावरील हिंसक दृश्यांचा तरुणांच्या मनावर खोलवर परिणाम होतो. यातून त्यांना हिंसेबद्दल आकर्षण वाटू शकते किंवा हिंसक वर्तन सामान्य वाटू शकते, मारामारी, खून, शारीरिक नुकसान, रक्तपात, डेड बॉडी याबद्दलची त्यांची नजर मरून जाते. बालपणीचे वाईट अनुभव गाठीशी असल्यास मुलं बाहेरील चुकीच्या व्यक्ती, प्रवृत्तीकडे लवकर आकर्षित होतात. कौटुंबिक हिंसाचार, दुर्लक्ष किंवा इतर वाईट अनुभवांमुळे मुलांच्या मनात राग, द्वेष आणि असुरक्षिततेची भावना निर्माण होते, जी पुढे जाऊन हिंसक वर्तनात बदलू शकते. आपल्या घरात, कुटुंबात, आयुष्यात काहीच चांगलं सुरू नाहीये, आजूबाजूच्या परिसरात पण सातत्याने भांडणे, शिवीगाळ, हाणामारी, आजारपण पाहून या मुलांचा आयुष्यातील सकारात्मक भावनांवरील विश्वास निघून जातो. यावर आपण काय उपाययोजना करणे आवश्यक आहे याचा वेध घेतला असता, बाल गुन्हेगारी, शस्त्रांचा वापर आणि अमली पदार्थांचे व्यसन या समस्यांवर नियंत्रण मिळवण्यासाठी व्यापक आणि बहुस्तरीय उपाययोजना करणे आवश्यक आहे. कौटुंबिक स्तरावर पालकांनी मुलांशी संवाद साधणे, मोकळा संवाद साधणे, त्यांच्या समस्या समजून घेणे आणि त्यांना योग्य मार्गदर्शन करणे महत्त्वाचे आहे. सकारात्मक आदर्श घालून देणे महत्त्वाचे आहे. पालकांनी स्वतः मुलांसमोर चांगले आदर्श ठेवणे, वेळेवर गांभीर्याने कोणत्याही घटनेकडे लक्ष देणे, मुलांच्या सवयी, मित्र-संगत आणि त्यांच्या वागणुकीतील बदलांवर पालकांनी बारीक लक्ष ठेवणे गरजेचे आहे. मुलांना लहानपणापासूनच नैतिक मूल्ये, योग्य-अयोग्य यातील फरक आणि इतरांप्रती सहानुभूती शिकवावी. शैक्षणिक स्तरावर जागरूकता कार्यक्रम राबवणे, शाळा आणि कॉलेजांमध्ये शस्त्रांचे आणि अमली पदार्थांचे दुष्परिणाम, कायदेशीर बाबी आणि मानसिक आरोग्याविषयी नियमितपणे जागरूकता कार्यक्रम आयोजित करणे, सल्ला आणि मार्गदर्शन केंद्रे यांची मदत घेणे खूप महत्त्वाचे आहे. शाळा-कॉलेजांमध्ये समुपदेशन (उेीपीशश्रळपस) आणि मार्गदर्शन केंद्रांची स्थापना करून विद्यार्थ्यांना मानसिक आधार द्यावा. शैक्षणिक संस्थांमध्ये सकारात्मक आणि सुरक्षित वातावरणाची निर्मिती करावी, जिथे विद्यार्थी स्वतःला व्यक्त करू शकतील. सामाजिक स्तरावर सुद्धा या मुलांसाठी अनेक प्रयत्न केले जावू शकतात. सामाजिक संस्था आणि स्वयंसेवी संस्थांचा सहभाग यामध्ये मदत करू शकतो. या क्षेत्रात काम करणाऱ्या सामाजिक आणि स्वयंसेवी संस्थांना प्रोत्साहन देऊन त्यांच्या माध्यमातून जनजागृती आणि व्यसनमुक्तीचे कार्यक्रम राबवणे गरजेचे आहे. सार्वजनिक ठिकाणी, शाळा, कॉलेज परिसर आणि तरुणांच्या इतर गर्दीच्या ठिकाणी पोलीस आणि संबंधित यंत्रणांनी कडक नजर ठेवणे, अशा मुलांविरुद्ध आलेल्या तक्रारीची ताबडतोब दखल घेऊन कारवाई करणे, त्यांच्या पालकांना देखील समज देणे यावर भर द्यावा. समाजात यशस्वी आणि सकारात्मक जीवन जगणाऱ्या व्यक्तींना तरुणांसमोर आदर्श म्हणून प्रस्तुत करावे. शिक्षणाच्या, रोजगाराच्या संधी युवकांना मोठ्या प्रमाणात उपलब्ध करून देण्याची जबाबदारी शासकीय पातळीवार, उद्योजक यांच्यामार्फत देण्यात यावी. कायदेशीर आणि प्रशासकीय स्तरावर कायद्याची कठोर अंमलबजावणी अवैध शस्त्रे आणि अमली पदार्थांशी संबंधित कायद्यांची कठोर अंमलबजावणी करावी. गुन्हेगारांना वेळेवर आणि योग्य शिक्षा व्हावी. अवैध शस्त्रे आणि अमली पदार्थांचे स्रोत उद्ध्वस्त करणे, पोलीस आणि इतर तपास यंत्रणांनी अवैध शस्त्रे आणि अमली पदार्थांचे उत्पादन, तस्करी आणि विक्री करणारे नेटवर्क उद्ध्वस्त करण्यासाठी विशेष मोहीम राबवावी. व्यसनाधीन व्यक्तींना योग्य उपचार आणि पुनर्वसनाची सोय उपलब्ध करून द्यावी. बाल न्याय मंडळाची प्रभावी भूमिका बाल गुन्हेगारांच्या बाबतीत बाल न्याय मंडळाने (र्गीींशपळश्रश गीीींळलश इेरीव) संवेदनशीलतेने आणि कायद्यानुसार योग्य कारवाई करावी, जेणेकरून त्यांना सुधारण्याची संधी मिळेल. सायबर गुन्हेगारीवर नियंत्रण ऑनलाइन माध्यमातून होणाऱ्या शस्त्रांच्या किंवा अमली पदार्थांच्या प्रसारावर नियंत्रण ठेवण्यासाठी सायबर पोलिसांना अधिक सक्षम करावे. या समस्यांवर मात करण्यासाठी पालक, शिक्षक, समाज, शासन आणि स्वतः तरुण पिढी या सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. योग्य वेळी योग्य हस्तक्षेप आणि मदतीमुळे अनेक तरुणांना चुकीच्या मार्गावर जाण्यापासून वाचवता येऊ शकते आणि त्यांना एक उज्ज्वल भविष्य मिळू शकते.

# राहुल गांधींना निवडणूक आयोगाची चपराक

सातत्याने एकच गोष्ट खोट बोलत राहिलो की, तीच गोष्ट लोकांना खरी वाटू लागते. असेच तत्त्वज्ञान गोबेल्स या हिटलरच्या युद्ध विशारदाने वापरले होते. त्यामुळे हिटलरचा विजय झाला नाही, पण हिटलरच्या म्हणण्यात तथ्य आहे असे वाटू लागले. तीच गोष्ट राहुल गांधी यांची म्हणता येईल. राहुल यांना एकच गोष्ट वारंवार खोटे सांगण्याची सवय जडली आहे आणि प्रत्येक निवडणुकीत ते पराभूत होत जातात आणि तरीही भाजपावर आरोपांच्या फैरी झाडत जातात, पण त्यांचा काहीही उपयोग होत नाही उलट लोकांमध्ये हसू मात्र होते. राहुल यांनी ताज्या आरोपांमध्ये भाजपावर अत्यंत गंभीर आरोप केले आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की भाजपाने अलीकडच्या काही निवडणुकांत मोठा फ्रॉड केला आहे आणि त्याचा पर्दाफाश आपण करतो असा आव त्यांनी आणला आहे. पण निवडणूक आयोगाने परस्परच त्यांना चपराक दिली आणि त्यांचे आरोप किती खोटे आणि हास्यास्पद आहेत हे दाखवून दिले आहे. भाजपाचे अध्यक्ष जे पी नड्डा यांनी राहुल यांना उत्तर दिले आहे आणि तेही त्यांच्याच शैलीत. त्यांनी म्हटले आहे की राहुल यांनी ज्या आपल्या ताज्या लेखात आरोप केले आहेत ते त्यांच्या फेक नरेटिव्ह म्हणजे खोट्या कहाणीचा लेखाजोखा आहे. त्यातून त्यांची येणाऱ्या बिहार निवडणुकीत काँग्रेस आणि त्यांच्या साथीदार पक्षांना कशी निराशा येणार आहे त्याचे द्योतक आहे. त्यांनी राहुल यांच्या प्रत्येक फेक नरेटिव्हची चिरफाड केली असून त्यांच्या प्रत्येक मुद्याला उत्तर दिले आहे. काँग्रे`स निवडणुकीमागून निवडणुकीत पराभूत होत आहे आणि दरवेळेस काँग्रेस पक्ष त्यांना जबाबदार धरण्याऐवजी तिसऱ्याच कुणाला तरी जबाबदार धरत असतो. हे भारतातील जनतेने अनेकवेळा पाहिले आहे. पण जे पी नड्डा यांचे जाऊ द्या. ते तर प्रतिस्पर्धी आहेत, पण खुद्द निवडणूक आयोगाने राहुल यांच्या आरोपांना बेबुनियाद म्हटले



आहे आणि आयोग तर कुणाचाच गुलाम नाही. त्यामुळे त्याचे म्हणणे राहुल मान्य करणार की नाही हे महत्त्वाचे आहे. राहुल गांधी यांनी भाजपावर जे आरोप केले होते ते मॅच फिक्सिंगचे त्या आरोपांचे खुद्द आयोगानेच खंडन केले आहे. त्यांचे म्हणणे तरी राहुल मान्य करणार की नाही की हाही विरोधकांचा म्हणजे काँग्रे`स विरोधकांची खेळी आहे असे म्हणणार असा प्रश्न आहे. राहुल गांधी यांच्याकडे लोकांना देण्यासाठी काहीही आकर्षक कार्यक्रम नाही आणि घोषणाही नाही. त्यांच्याकडे लोकांना आपल्याकडे टिकवून ठेवण्यासाठी काहीही योजना नाहीत. काँग्रेसकडे पैसा नाही. नेत्यांकडे प्रचंड पैसा आहे पण पक्षाकडे एक रुपयाही नाही. पक्षाच्या कार्यक्रमाची बिले भागवण्यासाठीही त्यांच्याकडे पैसा नाही. अशा परिस्थितीत राहुल भाजपावर आरोप करतात म्हणजे त्यांच्या धाडसाची कमालच आहे. मतदारांनी तुम्हाला मान्य नाही असा निकाल दिल्यावर त्याची विल्हेवाट मॅच फिक्सिंग करण्याच्या आरोपावरून करणे याला निवडणूक आयोगाने जोरदार खडसावले आहे. एका राष्ट्रीय दैनिकात राहुल यांनी लिहीलेल्या लेखात आपले नेहमीचे आरोप केले आणि त्यावर आयोगाकडून जोरदार प्रतिक्रिया उमटल्या. भारतीय निवडणूक आयोगाने म्हटले आहे की महाराष्ट्राच्या मतदार याद्यांवर केलेले आरोप हे पूर्णपणे चुकीचे तर आहेतच पण कायद्याच्या राजवटीचा अपमान करणारे आहेत. काँग्रेस पक्षाला दिलेल्या उत्तरात आयोगाने वारंवार यावर उत्तर दिले होते आणि हे दस्तऐवज अजूनही आयोगाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहेत असेही सांगितले आहे. पण राहुल यांना ते पाहायचे नाही आणि उगीच आरोप करत सुटायचे अशी सवय लागली आहे. शिवाय ते युवराज असल्याने त्यांना कुणीही पक्षात विचारू शकत नाहीत असा त्यांचा समज आहे. निवडणूक आयोगाशी तडजोड झाली आहे असा आरोप करणे म्हणजे लाखो आयोगाच्या कर्मचाऱ्यांना खोटे ठरवण्याचा हा प्रयत्न आहे अशा शब्दात राहुल यांना आयोगाने फटकारले आहे. राहुल यांच्या आरोपांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिले आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत काँग्र`स पक्षाकडे लोकांना देण्यासारखे काहीही नाही आणि त्यामुळे खोट` बोलून स्वतः ला खोटी सहानुभूती करण्याचे त्यांचे हे प्रयत्न आहेत. राहुल यांचा हरियाणात आधी पराभव झाला. त्यानंतर दिल्ली विधानसभा निवडणुकीत पराभव झाला. त्यानंतर महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत पराभव झाला आणि दरवेळी ते तीच तीच रेकॉर्ड वाजवत बसले आहेत त्यामुळे त्यांची आज जशी निवडणूक आयोगाने केली तशी गत बिहार विधानसभा निवडणुकीतही होणार आहे. पक्षाचे काम पाहावे, पक्षाला संजीवी द्यावी, पक्ष गतीमान पद्धतीने चालवाव तरच लोक काँग्र`सला मते देतील. पण ते सोडून राहुल केवळ भाजपावर खोटे आरोप करत बसले आहेत आणि त्याची परिणती त्यांच्या आणखी एका पराभवात होणार आहे हे निश्चित. राहुल यांचे हे फेक नरेटिव्ह सेट केल्याचे प्रकार पहिलेच नाहीत. या अगोदरही राहुल यांनी हाच प्रकार केला होता आणि महाराष्ट्रात माती खाल्ली होती. कारण लोकांनीच त्यांना माती चारली होती. अजूनही राहुल हे नेहरू आणि इंदिरा गांधी यांच्या काळात वावरत आहेत त्यांच्या काळात एकमेकांना दुसऱ्यांची खोटी भीती दाखवून चालत होते आणि लोक काँग्र`सला मते देत. पण आज तशी स्थिती नाही. आज सारी माध्यमे जागृत झाली आहेत आणि समाजमाध्यमे कधी नव्हे ती आज प्रगत आहेत त्यामुळे कुणाचेही कितीही खोटे लोकांबरोबर समजते. राहुल यांना ते समजत नाही हीच काँग्र`सची शोकांतिका आहे. पण राहुल यांच्या आरोपांमध्ये यापेक्षाही जास्त गंभीर आहे ते म्हणजे त्यांनी मोदी यांच्यावर टीका करताना पाकिस्तानची भाषा बोलली आहे. ती खरोखरच निषेधार्ह आहे. तसेच आता महाराष्ट्र सरकारच्या लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थींचा अपमान केला आहे ही बाब अत्यंत गंभीर आहे. राहुल आपल्याकडे लोकशाही आहे म्हणून इतके बोलू शकतात आणि आरोप करू शकतात. तरीही मोदी सरकार विरोधकांचा आवाज दाबून टाकत आहे असा आरोप करण्यास राहुल मोकळे होतात. आता राहुल यांना आयोगानेच परस्परच तंबी दिल्याने त्यांची काही दिवस तरी बकबक शांत राहील अशी आशा आह

# ग्रामीण रस्त्याची कामे सुरु करण्यासाठी बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन

## आ.संदीप क्षीरसागरांच्या दबावतंत्रामुळे बीड तालुक्यात रस्त्याची कामे रखडल्याचा आरोप

प्रतिनिधी बीड दि.९ : तालुक्यातील ग्रामीण भागातील नाळवंडी, पालीसह इतर जिल्हा परिषद गटातील ग्रामीण रस्त्यांची कामे आ.संदीप क्षीरसागर यांनी अडविल्याचा आरोप करत अनेक गावचे सरपंच, पदाधिकाऱ्यांनी बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सोमवारी (दि.९) सकाळी ११ वाजता लक्षवेधी धरणे आंदोलन सुरू केले आहे.हे आंदोलन राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, नाळवंडीचे सरपंच ॲड.राजेंद्र राऊत, भाजपचे जिल्हा सचिव शांतीनाथ डोरले यांच्या नेतृत्वाखाली सुरू आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर, माजी नगरसेवक अमर नाईकवाडे, युवा नेते महेश धांडे, भाजप राज्य कार्यकारिणी सदस्य डॉ. लक्ष्मण जाधव, महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक अध्यक्ष ॲड.सतीश शिंदे, भाऊसाहेब डावकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे युवकचे बीड तालुकाध्यक्ष नंदकुमार कुटे, पंचायत समितीचे माजी सदस्य उत्तरेश्वर सोनवणे, युवासेना जिल्हाप्रमुख सुमित कोळपे, अरुण लांडे, प्रदीप गायकवाड, सरपंच धनेश्वर खेत्रे, दत्ता जाधव, रोहित जाधव, सिद्धार्थ जाधव, राजाभाऊ नवले, लकी कंडेरे, राजू टाक, सुमंत राऊत, नामदेव म्हेत्रे, सखाराम राऊत, सचिन उनवणे यांच्यासह अनेकजण सहभागी झाले होते.ॲड.राजेंद्र राऊत यांनी म्हटले की, आ.संदीप क्षीरसागर यांच्या दबावतंत्रामुळे अधिकारी रस्त्याचे मार्कआऊट देत नसून रस्त्याचे काम रखडले आहे. त्यामुळे आमदारांसह अधिकाऱ्यांचा निषेध करण्यासाठी आंदोलन करत असल्याचे सांगितले. बीड तालुक्यातील नाळवंडी, पालीसह इतर जिल्हा परिषद गटातील नाळवंडी ते मौज व्ही.आर.क्र. २४३ काळेगाव हवेली ते लम ाण तांडा रस्ता व्ही.आर. ३५४, ओडीआर ५० ते मानकुरवाडी रस्ता व्ही.आर. ३७, पाली ते वरवटी इजिमा १२७, पाली ते वरवटी इजिमा १२७ यांसह इतर अनेक रस्ते सुधारणा अंतर्गत कामे आहेत. सदर रस्ते हे जिल्हा नियोजनमधून सन २०२४ या वर्षामध्ये मंजूर आहेत. सदर रस्त्याचे कार्यारंभ आदेश ६ महिन्यांपूर्वी झालेले आहेत. या रस्त्याचे काम सन २०२४ मध्ये जिल्हा नियोजन समितीमार्फत मंजूर झाले असून, डिसेंबर २०२४ मध्ये कामाचे कार्यारंभ आदेश निघाले आहेत. मात्र, बीडमधील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंता, उपअभियंत्यांकडून अद्यापही कामाचे मार्कआऊट देण्यात आलेले नाहीत. आ.संदीप क्षीरसागर यांना ज्या भागातून अल्प मतदान झाले, त्या त्या भागातील कामे थांबवण्यात येत असल्याचा आरोप सरपंच ॲड. राऊत यांनी केला आहे. यापूर्वीही त्यांनी अनेक विकासकामात खोडा घातला, परंतु यापुढे त्यांची मनमानी सहन केली जाणार नाही, त्यांच्याविरोधात वेळोवेळी आवाज उठविला जाईल, असा इशाराही ॲड.राऊत यांनी दिला आहे. दरम्यान, मागण्यांचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांना देण्यात आले. यावेळी बीड तालुक्यातील अनेक गावचे सरपंच, पदाधिकारी, ग्राम स्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### प्रशासनाच्या भूमिकेचा निषेध

वारंवार पत्रव्यवहार करूनही प्रशासनाकडून या प्रकरणाची दखल घेतली जात नाही. त्यामुळेच आम्हाला रस्त्यावर उतरावे लागले, असे सांगत आंदोलकांनी प्रशासनाच्या भूमि केचा तीव्र निषेध व्यक्त केला. धरणे आंदोलनादरम्यान घोषणाबाजी करत ग्रामस्थांनी रोष व्यक्त केला.

### रास्ता रोकोचा इशारा कायम

आजच्या आंदोलनातूनही प्रशासनाने सकारात्मक पावले उचलली नाहीत, तर सोमवार, १६ जून रोजी जरुड फाटा येथे रास्ता रोको आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही सरपंच ॲड.राजेंद्र राऊत यांनी दिला आहे. जबाबदार अधिकारी घटनास्थळी उपस्थित राहेपर्यंत रास्ता रोको मागे घेतला जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### काम रखडल्याने ग्रामस्थ हैराण

सदरील रस्ता रहदारीचा असून, काम रखडल्यामुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे तत्काळ मार्कआऊट करून काम सुरू करण्यात यावे, अशी ग्रामस्थांची मागणी आहे. या आंदोलनाची प्रत पालकमंत्री ना.अजित पवार, जिल्हाधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी, पोलीस प्रशासन यांना देण्यात आली आहे.



बीड/महाराष्ट्र
विशेष वार्ता

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

मंगळवार १० जून २०२५
https://lokaarambh.com




2 जून ते 12 जून पर्यंत वरिष्ठ व निवड श्रेणी प्रशिक्षण प्राथमिक स्तर हा अध्यापक विद्यालय बीड येते चलो आहेत.तेथे सुलभक म्हणून श्रीमती मिर्झा कौसर मेडम , श्रीमती शैलजा आव्हाड मेडम,नवले सर,सपकाळ मेडम,आणि तसेच मोहम्मद इशक सर आहेत. हा प्रशिक्षण मध्ये जे घटक आहेत . त्याच्या माहिती सर्व प्रशिक्षणार्थी पर्यंत योग्य पद्धती ने पोहचविण्यात येते.तसेच प्रशिक्षणार्ती पण आनंदाने यत्त सहभागी होत आहेत.

## गोविंदवाडी येथे अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त सिमेंट बेंच भेट




गेवराई : लोक इच्छा तालुक्यातील तलवाडा नजिक असलेल्या गोविंदवाडी येथे राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त जयंतीचे औचित्य साधून सामाजिक कार्यकर्ते राजेश पेजगुडे , राहुल मराठे यांच्या वतीने गावातील नागरिकांना बसण्यासाठी सिमेंट बेंच भेट देण्यात आले.यावेळी सर्वप्रथम राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी श्रीक्षेत्र श्रृंगऋषीगडाचे ह.भ.प.सुरेशानंद महाराज, व्याख्याते चांभारे, माणिकराव राऊत, पं.स. सदस्य शाम कूंड, माऊली म. जाधव, रुद्रेश्वर अर्बनचे संस्थापक अध्यक्ष नवनाथ जाधव, माजी उपसभापती डॉ.आसाराम मराठे सरपंच कल्पना मराठे , देवराव बिचकुले अण्णासाहेब मोरे, कारभारी बिचकुले, नितीन पेजगुडे, महादेव शिंगाडे ,दत्ता झणझणे, सुशील गिरी, कृष्णा शेंडगे ,दत्ता शेंडगे, तुकाराम नरवडे , दिग्विजय मराठे, सुशील नवले, अनिल मोरे ,अमर मराठे, विठ्ठल पेजगुडे, भैय्या बिचकुले, शलिकराम बिचकुले, धोंडीराम कऱ्हे ,शरद जगदाळे, पांडुरंग गायकवाड, लक्ष्मण शिंगाडे ,चंद्रकांत बिचकुले ,गंगाराम नवले ,महादेव बिचकुले, विष्णू शिंगाडे , सह आदी ग्रामस्थ व राजेश पेजगुडे मित्रमंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.




बीड (प्रतिनिधी ): छत्रपती संभाजीनगर येथील सिडको भागातील त्रिदेवता मंदिराच्या महिला योग वर्ग टीम बीड येथे दि. 8 जून 2025 रोजी आल्या असता त्यांचे स्वागत करताना योगशिक्षक डॉ. संजय तांदळे दिसत आहेत.

## आचार्य अत्रे साहित्य गौरव पुरस्कार 24- 25 ने सन्मानित सौ.प्रतिमा काळे/ खेमनर

निगडी:~काव्य मित्र प्रकाशन संस्थेच्या २५ व्या वर्धापनदिनी,सौ. प्रतिमा अरुण काळे/खेमनर यांना आचार्य अत्रे साहित्य गौरव पुरस्कार २४-२५ ने सन्मानित करण्यात आले.पुरस्कार प्रदान सोहळ्यास माजी अधिष्ठाता,महात्मा फुले कृषीविद्यालय,राहुरी चे डॉ.प्रकाश तूरबतमठ सर,लोणावळा येथील ज्येष्ठ सेवाभावी उद्योजक नंदू भाऊ उर्फ बाबूजी वाळुंजे सर,माजी प्रकल्प अधिकारी यशदा तथा संस्थापक अध्यक्षा,देवा फाऊंडेशनच्या योगिता म्हस्के मॅडम. संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन,नियोजन संस्थापक अध्यक्ष,काव्यमित्र संस्था चे श्री.राजेंद्र विमलाई श्रीमंत सगर सरांनी केले.

# माऊली दादानी लोकोद्धाराचे काम केले महंत प्रकाश महाराज बोधले

## श्रीक्षेत्र चाकरवाडीत मिनी कुंभमेळा प्रचंड गर्दी

बीड - विसाव्या शतकातील महान संत विभुती ज्ञानेश्वर दादा माऊली यांनी लोकोद्धाराचे काम केले. त्यामुळे आज श्रीक्षेत्र चाकरवाडीत मिनी कुंभ मेळा भरला आहे. संतांच्या आशीर्वादांची शिदोरी आयुष्यभर सरत नाही असे प्रतिपादन प्रकाश महाराज बोधले यांनी केले. दुसऱ्या दिवसाचे कीर्तन पुष्पगुंपताना ते बोलत होते.. यावेळी प्रमुख उपस्थिती महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, महंत महादेव महाराज चाकरवाडीकर श्री ह भ प नारायण भाऊ उत्तरेश्वर पिंपरीकर, श्री ह भ प रामकृष्ण रंधवे बापू , श्री ह भ प नाना महाराज कदम, श्री ह भ प सुरेश महाराज जाधव, श्री ह भ प गणेश महाराज जोगदंड श्री ह भ प हरिदास भाऊ जोगदंड, शिवानंद महाराज गिरी यांच्यासह हजारो भावी फक्त उपस्थित होते. बीडच्या श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे विसाव्या शतकातील महान संत विभूती ज्ञानेश्वर दादा माऊली



यांच्या रोप्य महोत्सवी पुण्यतिथी उत्सवात दुसऱ्या दिवसाचे कीर्तन पुष्प श्री ह भ प प्रकाश महाराज बोधले यांनी वाहिले.. यावेळी संत तुकाराम महाराज यांच्या तुमचिये दासींचा दास करूनि ठेवा । आशीर्वाद द्यावा हाचि मज ॥१॥ नवविधा काय बोलली जी भक्ती । घ्यावी माझ्या हातीं संतजनीं ॥२॥ तुका म्हणे तुमच्या पायांच्या आधारें । उत्तरेन खरें भवनदी ॥३॥ या अभंगावर चिंतन मांडले यावेळी पुढे बोलताना महाराज म्हणाले की मराठवाड्यामध्ये वारकरी संप्रदाय प्रचार प्रसाराचे काम दादा माऊलींनी मोठ्या प्रमाणात केली त्यांनी संपूर्ण आयुष्य जनसामान्यांच्या उद्धारासाठी खर्च केले. त्यामुळेच आज हा वैभवशाली सोहळा होत आहे.. पुढे बोलताना महाराज म्हणाले की जगातील प्रत्येक माणूस स्वार्थी त्यागी माणूस आजपर्यंत जन्माला आलेला नाही. संतही मागतात देवही मागतो आणि जीवही मागतो.. प्रत्येकाची मागणी वेगवेगळ्या असते..नको ब्रम्ह ज्ञान आत्मस्थिती भाव... साधू भक्ती प्रेम मागतात. परमार्थ चांगला सुरू असेल तर देव संसारातील काही तरी गोष्ट अनुकूल करतो जीव त्यात अडकतो या अभंगात संताकडे आशीर्वाद मागतात. राजाकडे वैभव मागावे. संताकडे आशीर्वाद मागावा. आशीर्वादामध्ये खूप मोठी ताकद असते..प्रतिज्ञा ही शक्ती ने केली जाते... आशीर्वाद हा देणाऱ्यांच्या अंतकरणाच्या समाधानाचा भाव असतो.. या अभंगांमध्ये जगद्गुरु तुकाराम महाराज संतांच्या दाशीचा तास करण्याची मागणी करतात. भक्ती काय आहे ही संतांनीच सांगितली पाहिजे.. कारण संत अनुभवाला आणून देतात. आपल्याला भक्ती कशी करवी हे माऊलींच्या पुण्यतिथी उत्सवात कळते. संतांच्या पायाच्या आधारानेच भव नदी तरुण जाता येते असे महाराज म्हणाले. कीर्तनात साथ संगत महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध मृदंग वादक राम महाराज काजळे, गायनाचार्य बिबीशन महाराज कोकाटे ओंकार महाराज जगताप ,अभिमान महाराज ढाकणे, विष्णु महाराज, संजय महाराज देवकर, माऊली महाराज आवटे यांच्यासह शेकडो टाळकरी मंडळी उपस्थित होते

## गोविंदवाडी येथे अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त सिमेंट बेंच भेट

गेवराई : लोक इच्छा तालुक्यातील तलवाडा नजिक असलेल्या गोविंदवाडी येथे राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त जयंतीचे औचित्य साधून सामाजिक कार्यकर्ते राजेश पेजगुडे , राहुल मराठे यांच्या वतीने गावातील नागरिकांना बसण्यासाठी सिमेंट बेंच भेट देण्यात आले. यावेळी सर्वप्रथम राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी श्रीक्षेत्र श्रृंगऋषीगडाचे ह.भ.प.सुरेशानंद महाराज,



व्याख्याते चांभारे, माणिकराव राऊत, पं.स. सदस्य शाम कूंड, माऊली म. जाधव, रुद्रेश्वर अर्बनचे संस्थापक अध्यक्ष नवनाथ जाधव, माजी उपसभापती डॉ.आसाराम मराठे सरपंच कल्पना मराठे , देवराव बिचकुले अण्णासाहेब मोरे, कारभारी बिचकुले, नितीन पेजगुडे, महादेव शिंगाडे ,दत्ता झणझणे, सुशील गिरी, कृष्णा शेंडगे ,दत्ता शेंडगे, तुकाराम नरवडे , दिग्विजय मराठे, सुशील नवले, अनिल मोरे ,अमर मराठे, विठ्ठल पेजगुडे, भैय्या बिचकुले, शलिकराम बिचकुले, धोंडीराम कऱ्हे ,शरद जगदाळे, पांडुरंग गायकवाड, लक्ष्मण शिंगाडे ,चंद्रकांत बिचकुले ,गंगाराम नवले ,महादेव बिचकुले, विष्णू शिंगाडे , सह आदी ग्रामस्थ व राजेश पेजगुडे मित्रमंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# 11 जून 25 रोजी निगडी प्राधिकरण, पुणे,44पुस्तक प्रकाशन,काव्य संमेलन व पुरस्कार प्रदान सोहळ्यास निमंत्रण

निगडी: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रि शताब्दी जन्मोत्सव निमित्त दत्तोपंत म्हसकर सार्वजनिक विश्वस्त संस्था,वृंदा अरविंद सभागृह निगडी प्राधिकरण पुणे ४४ येथे सौ.प्रतिमा काळे/ खेमनर लिखित प्रेमाचा मधुगंध काव्यसंग्रह,निसर्ग प्रतिमा हा लेख संग्रह तर धनंजय इंगळे संपादित नववधू या प्रातिनिधिक काव्यसंग्रहाचे प्रकाशन,खुले काव्य संमेलन,पुरस्कार प्रदान सोहळा आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रि शताब्दी जन्मोत्सव निमित्त सौ.प्रतिमा काळे यांनी सलग पाचव्या वर्षी ही एकूण पाच स्पर्धांचे आयोजन केले होते.त्यात लेख लेखन,काव्य लेखन,रांगोळी,चित्रकला,वक्तृत्व या स्पर्धांचा समावेश होता.त्यातील विशेष विजेत्यांचा ही पुरस्कार प्रदान सोहळा आयोजित केलेला आहे.कार्यक्रमाचे अध्यक्ष: ८९ वे अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ.श्रीपाल सबनीस सर,संमेलनाध्यक्ष,प्रा.चंद्रकांतदादा वानखेडे/राष्ट्रपती पदक विजेते सीताराम नरके सर,पुरस्कार प्रदान सोहळा माननीय माजी महापौर,पिंपरी चिंचवड महानगरपालिका,सौ.शैलजा ताई मोरे,कार्यक्रम उद्घाटक महाराष्ट्र कामगार साहित्य परिषद अध्यक्ष माननीय पुरुषोत्तम सदाफुले,मामा,कवी संमेलन अध्यक्ष : प्रा.हेमंत सामंत सर,कवी संमेलन उद्घाटक,बाबा भारती प्रतिष्ठान चे अध्यक्ष माननीय महेंद्र भारती सर,कवी संमेलन स्वागताध्यक्ष प्रा.पांडुरंग भोसले सर.

विविध क्षेत्रातील मान्यवर विशेष उपस्थिती,प्रमुख पाहुणे,विशेष सत्कार्थी,पुरस्कार विजेते आणि काव्यप्रेमी उपस्थित राहणार आहे. कार्यक्रमाचे आयोजन शिक्षिका, लेखिका,कवयित्री,संपादिका,निवेदिका सौ.प्रतिमा अरुण काळे/खेमनर व लघु उद्योजक,कवी,लेखक,संपादक श्री. धनंजय इंगळे सरांनी केलेले आहे.सर्व साहित्य रसिकांनी संमेलनास,बुधवार दिनांक ११ जून २५ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ पर्यंत दत्तोपंत म्हसकर सार्वजनिक विश्वस्त संस्था,वृंदा अरविंद सभागृह निगडी प्राधिकरण पुणे ४४ येथे उपस्थित रहावे असे आव्हान केले आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज गौरव सर्किट हा प्रेरणादायी प्रवास - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## छत्रपती शिवाजी महाराज सर्किट रेल्वेला हिरवा झेंडा दाखवून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला शुभारंभ

मुंबई, दि. ९ - भारतीय रेल्वेची गौरव यात्रा अंतर्गत आज पासून सुरू होणारा छत्रपती शिवाजी महाराज सर्किट हा प्रवास सर्व प्रवाशांसाठी एक प्रेरणादायी अनुभव असेल असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे छत्रपती शिवाजी महाराज सर्किट अंतर्गत भारत गौरव रेल्वेच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज यांचा आणि स्वातंत्र्य इतिहास जिवंत ठेवण्याचे काम या रेल्वेच्या माध्यमातून होणार आहे. आज या रेल्वेतून सातशे पेक्षा जात प्रवासी प्रवास करत आहेत. यातील ८० टक्के प्रवासी हे चाळीस वर्षाच्या आतील आहेत. जे आज छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास पाहण्यासाठी जात आहेत. राज्यातील सर्व भागातून आलेल्या सर्व प्रवाशांना या सर्किट रेल्वेच्या माध्यमातून इतिहास अनुभवण्याची संधी मिळणार आहे. शिवराज्याभिषेकास ३५१ वर्ष पूर्ण होत आहेत. आजच्या या दिवशी ही रेल्वे सुरू होत असल्याचा आनंद आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. मोगल, परकीय आक्रमकांना पराभूत करून छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची निर्मिती केली असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पुढे हे स्वराज्य अटकेपर्यंत विस्तारले. ही गौरव यात्रेचा आजचा मुक्काम रायगड येथे असणार आहे. तसेच या यात्रेत शिवनेरी, लालमहाल, पुण्याची शिवसृष्टी अशा महत्त्वाच्या ठिकाणांना भेट देणार आहे. तर कोल्हापूरच्या अंबाबाईचे दर्शन ही होणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्यासोबतच राज्याचे संस्कृती कार्य मंत्री आशिष शेलार आणि त्यांचा विभाग, पर्यटन विभाग यांचे अभिनंदन करतो. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रवाशांना शुभेच्छा दिल्या. तसेच या पहिल्याच सर्किट यात्रेत प्रवास करत असल्याबद्दल त्यांचे अभिनंदनही केले. यावेळी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, सांस्कृतिक विभागाचे सचिव विकास खारगे, पर्यटन प्रधान सचिव अतुल पाटणे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मनोज कुमार सूर्यवंशी, भारतीय रेल्वेचे जनरल मॅनेजर धर्मवीर मीना, आय आर सी टी सी चे राहुल हिमालियन,



महाराष्ट्र पर्यटन विभागाचे विकास महामंडळाचे महाव्यवस्थापक चंद्रशेखर जयस्वाल, वरिष्ठ व्यवस्थापक संजय ढेकणे यांच्यासह रेल्वेचे अधिकारी, प्रवासी उपस्थित होते. रेल्वे मधुन प्रवास करणाऱ्या पर्यटकांचे रेल्वे स्थानकावर महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांचे कडून पारंपरिक ढोल-ताशा यांच्या गजरात स्वागत करण्यात आले. पर्यटकांना पुष्प गुच्छ देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. पर्यटकांना महाराष्ट्र राज्यातील पर्यटनाच्या दृष्टीने तयार करण्यात आलेली माहिती पत्रके वाटून माहीती देण्यात आली. एकूणच उत्साही वातावरणात पर्यटकांना या प्रवासासाठी रवाना करण्यात आले. या ५ दिवसांच्या विशेष टूरमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनाशी संबंधित महत्त्वाच्या ऐतिहासिक स्थळांना भेट, इतिहासावर आधारीत कार्यक्रम आयोजित केले आहेत. भारतीय रेल्वे विभाग आणि महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ महाराष्ट्र शासनाशी समन्वय साधून, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई येथे या गौरवशाली ट्रेनचे हे आगमन महाराष्ट्राच्या संस्कृतीचे भव्य दर्शन घडवणारे ठरेल.भारत गौरव ट्रेन ज्या-ज्या ठिकाणी पोहोचेल, त्या ठिकाणी असलेल्या पर्यटन स्थळांची सविस्तर माहीती पर्यटकांना देण्यात येणार आहे. सर्व प्रवाशांचा अनुभव सुखकर आणि संस्मरणीय व्हावा, यासाठी महामंडळाचे अधिकारी आयरसीटीसी च्या समन्वयाने प्रत्येक टप्प्यावर मार्गदर्शन करतील. 5 दिवसांच्या या प्रवासात रेल्वे स्थानकांपासून ते महाराजांच्या गडकिल्ल्यांपर्यंत, प्रत्येक ठिकाणी इतिहासाच्या पाऊलखुणांचा वेध घेत, पर्यटकांना पर्यटनाचा आनंद घेता येईल सहल तपशील

पाच दिवसांची ही यात्रा पुढील ठिकाणांना भेट देणार आहे. रायगड किल्ला छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक येथे झाला व ही राजधानी होती. लाल महाल, पुणे छत्रपती शिवाजी महाराज यांचे बालपण येथे गेले. कसबा गणपती व शिवसृष्टी, पुणे पुण्याचे ग्रामदैवत व छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावरील संग्रहालय. शिवनेरी किल्ला छत्रपती शिवाजी महाराज यांचे जन्मस्थळ. भीमाशंकर ज्योतिर्लिंग 12 ज्योतिर्लिंग पैकी एक प्रमुख धार्मिक स्थळ. प्रतापगड किल्ला अफझल खानावरील ऐतिहासिक विजयाचे ठिकाण. कोल्हापूर महालक्ष्मी मंदिर पन्हाळा किल्ला बाजीप्रभू देशपांडे यांच्या शौर्याचे प्रतीक.

# डोनाल्ड ट्रम्प यांनी मर्यादा ओलांडल्या कॅलिफोर्नियाकडून कोर्टात खटला

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आपल्या वेगवेगळ्या निर्णयांमुळे अमेरिकेतच नाही तर जागतिक पातळीवरही चर्चेत आहे. आता अमेरिकेतील कॅलिफोर्नियानेच ट्रम्प प्रशासनाविरुद्ध न्यायालयात धाव घेतली आहे. ट्रम्प प्रशासनाविरोधात खटला दाखल केला आहे. कॅलिफोर्निया राज्याच्या गव्हर्नरच्या मंजुरीशिवाय लॉस एंजेलिसमध्ये दोन हजार सैनिक तैनात करण्याच्या निर्णय ट्रम्प यांनी घेतला. त्या निर्णयाच्या विरोधात खटला दाखल करण्यात आला आहे. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या मर्यादा ओलांडल्या आहेत, असा दावा करत हा खटला दाखल केला आहे. कॅलिफोर्नियाचे अॅटर्नी जनरल रॉब बोंटा म्हणाले की, ट्रम्प यांनी घेतला निर्णय बेकायदेशीर आहे. अमेरिकेत आधीच तणावपूर्ण परिस्थिती आहे. ती आणखी बिकट होऊ शकते. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या मर्यादा ओलांडल्या आहेत. त्यांनी गव्हर्नर गॅविन न्यूसम यांच्या संमतीशिवाय सैन्य तैनात करण्याचा निर्णय घेतला. कॅलिफोर्नियामध्ये कोणताही हल्ला झाला नाही किंवा



बंडखोरी झाली नाही. परंतु ट्रम्प त्यांचे राजकीय हितसंबंध पूर्ण करण्यासाठी जाणीवपूर्वक अराजकता निर्माण करत आहेत. ते संघीय कायद्याचा गैरवापर करत आहे. हा कायदा परकीय हल्ला किंवा अमेरिकन सरकारविरुद्ध मोठा बंड यासारख्या विशेष परिस्थितीत सैन्य पाठवण्याची परवानगी अमेरिकन राष्ट्राध्यक्षांना देतो. कॅलिफोर्निया सरकारने सांगितले की, सध्या अशी कोणतीही परिस्थिती नाही. लॉस एंजेलिसमध्ये इमिग्रेशन छाप्यांविरुद्ध हिंसक निदर्शने सुरु आहेत. त्यामुळे ट्रम्प यांनी त्या ठिकाणी सैन्य तैनात करण्याचा निर्णय घेतला. ट्रम्प यांच्या निर्णयास विरोध करताना गव्हर्नर न्यूसम आणि इतर डेमोक्रॅट नेते म्हणतात की, राज्य सरकार या परिस्थिती स्वतः हाताळू शकते आणि संघीय सरकारच्या हस्तक्षेपाची आवश्यकता नाही. गव्हर्नरकडून ट्रम्प यांना पत्र गवर्नर न्यूसम यांनी ट्रम्प यांच्या निर्णयास विरोध करत त्यांच्या प्रशासनाला पत्रही लिहिले आहे. त्यात म्हटले आहे की, लॉसएंजेलिसमध्ये सैन्य पाठवण्याची गरज नाही. हे सैन्य त्वरित माघारी बोलवण्यात यावे. संघीय प्रणालीत राज्याच्या अधिकाराचे हे उल्लंघन आहे. जाणीवपूर्वक हे पाऊल उठवण्यात आल्याचा संशय यामुळे वाटत आहे.

## अवकाळी पावसाने कांदा सडला कांदा उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात ; असंवेदनशील कृषीमंत्री माणिकराव कोकाटे म्हणतात ढेकळाचे पंचनामे करायचे का? पंचनामे करायला प्रशासनाला वेळ नाही :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश:-( दि.०९ ) अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.साठवणुक केलेला आणि बाजारात विक्रीसाठी तयार कांदा वादळीवाऱ्यासह पाऊस आणि ढगाळ वातावरणामुळे जमिनीतील ओलावा वाढल्याने कांद्याच्या साठवणुकीवर परीणाम झाला असून कांद्याला ओल लागली आहे.त्यामुळे शेतकऱ्यांना हा कांदा मिळेल त्या भावात विकावा लागणार आहे परीणामी शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसला असुन तोंडचा घास हिरावला आहे.
आधीच कांद्याला भाव नाही आणि आता दुष्काळात तेरावा महिना म्हणल्याप्रमाणे अवकाळी पाऊस ; शेतकऱ्यांनी जगायचं कसं ? :- कांदा उत्पादक शेतकरी कल्याण वाणी ( लिंबागणेश) साडे ३ एकर कांद्याची लागवड करण्यात आली.जवळपास रोपं,बियाणे,खत, फवारणी आदि २ लाख रुपयांच्या वर खर्च झालेला आहे. अवकाळी पावसाने काही कांदा शेतातच सडला तर काढुन झाकुन ठेवलेला कांदा पाण्याखाली गेला आणि तो काळपट पडला आहे तर काही कांद्याला कोंब फुटले आहेत. सध्या चांगल्या कांद्याला १५ रुपये पर्यंत भाव आहे.मग या काळपट पडलेल्या कांद्याला कोण विचारणार? सरकारचे धोरण चुकीचे आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मालाला भाव नाही आणि दुष्काळात तेरावा महिना म्हणल्याप्रमाणे अवकाळी पाऊस आणि महसूलचे अधिकारी पंचनाम्यासाठी फिरकत नाहीत आता तुम्हीच सांगा शेतकऱ्यांनी कसं जगायचं असा उद्विग्न सवाल लिंबागणेश येथील कांदा उत्पादक शेतकरी कल्याण भालचंद्र वाणी यांनी डॉ.गणेश ढवळे यांच्याशी बोलताना केला.
कृषीमंत्री जिथं ढेकळाचे पंचनामे करायचे का? म्हणत असतील तर महसूल प्रशासन पंचनामे कसे करणार?? :- डॉ.गणेश ढवळे
गेल्या आठवड्यात सिन्नर तालुक्यात अवकाळी पावसाने झालेल्या पिकांच्या नुकसानीची पाहणी करताना शेतातुन बाहेर काढुन ठेवलेल्या कांद्याचे पंचनामे करण्यात येऊन नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केल्यानंतर असंवेदनशील



कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी " काढलेल्या पिकांचे पंचनामे करून काय करायचे? ढेकळाचे पंचनामे करायचे का? असा सवाल शेतकऱ्यालाच विचारला. तसेच शेतात पडलेल्या कांद्याचे पंचनामे करायचे हे नियमात बसत नाही असे म्हणत शेतकऱ्यांबद्दल सहानुभूती पुर्वक विचार करण्याची मानसिकता नसल्याचे दाखवून दिले. त्यामुळे महसूल प्रशासनाचे अधिकारी व कर्मचारी पंचनामे करायला कशाला पुढाकार घेतील असा संतप्त सवाल डॉ.गणेश ढवळे यांनी विचारला आहे.

डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर
मो.नं.८१८०९२७५७२

## सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय निलपत्रेवार रुजू



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : उस्माननगर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक महेश मुळीक यांची नुकतीच पोलीस ठाणे माळाकोळी येथे बदली झाली असून, त्यांच्या ठिकाणी सहाय्यक पोलिस निरीक्षक संजय निलपत्रेवार यांनी उस्माननगर पोलीस ठाण्याचा पदभार स्वीकारला. उस्मानगर पोलीस स्टेशन येथे सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय निलपत्रेवार हे रुजू झाल्याबद्दल त्यांचा मारतळा विभाग पत्रकार संघाच्या वतीने यथोचित सत्कार करून पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या.यावेळी दैनिक सकाळचे जेष्ठ पत्रकार संजय पाटील ढेपे लोकमतचे वार्ताहार उत्तमराव हंबर्डे एकमतचे वार्ताहार संजय देशपांडे आदी उपस्थित होते.



बीड: तालुक्यातील मौजे ईट येथील गंगानाथवाडी शिवारातील गेल्या शंभर वर्षांपासून रस्ता असताना देखील रस्त्यावर कुपट्याचे फास टाकून अडवण्यात आला आहे . रस्ता मोकळा करून द्यावा यामागणीसाठी नायब तहसीलदार हजारे साहेब यांना निवेदन देताना सखाराम नरनाळे, गोरख नरनाळा, तात्याभाऊ नरनाळे,दिगंबर नरनाळे, दिपक भोसले , गायके मामा आदी ईट येथील नागरिक निवेदन देताना उपस्थित होते.

## इकडं युतीचे वारे तिकडं कार्यकर्त्यांत वेगळाच उत्साह, पुण्यात आदित्य-राज ठाकरेंचे एकत्र बॅनर!

राज्यात सध्या युती आणि आघाड्यांचे वारे वाहू लागले आहे. राष्ट्रवादीचे दोन्ही गट यांचे एकत्रिकरण होणार असल्याच्या चर्चा आहेत. हे दोन्ही गट एकत्र आले तर चांगलेच होईल, असे मत या दोन्ही गटांनी व्यक्त केले आहे. तर दुसरीकडे राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हो दोन्ही बंधूंच्या युतीच्याही चर्चा आहेत. असे असतानाच ठाकरे बंधूंच्या दोन्ही पक्षांत एक नवा उत्साह संचारला आहे. त्याची प्रचिती पुणे येथे आली आहे. राज ठाकरे आणि ठाकरे गटाचे नेते तथा आमदार आदित्य ठाकरे यांना एकाच बॅनरमध्ये एकत्र वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.
पुण्यात चौका-चौकात झळकले बॅनर्स
महाराष्ट्रात दोन्ही ठाकरे बंधू एकत्र येणार असल्याची जोरदार चर्चा सुरू आहे. शिवसैनिक तसेच मनसे सैनिकांत या संभाव्य युतीबाबत मोठी उत्सुकता आहे. त्याचीच प्रचिती पुण्यात आली. येथे आदित्य ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसैनिकाकडून एकाच बॅनरवर




शुभेच्छा देण्यात आला आहेत. आज (9 जून) राज ठाकरे पुणे दौऱ्यावर आहेत. असे असताना पुण्यातील शिवसैनिकांकडून चौका-चौकामध्ये आदित्य ठाकरे आणि मनसेप्रमुख राज ठाकरे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देणारे बॅनर लावण्यात आले आहेत. त्यामुळे दोन्ही पक्षातल्या कार्यकर्त्यांची आतापासूनच मनाची तयारी केल्याचे पाहायला मिळत आहे.

# कमी खर्च करत दोनशे लोकात लग्न लावा : सकल मराठा समाजाचा एकमुखी ठराव

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड - दोनशे लोकांत लग्न लावा मुला मुलींच्या लग्नात खर्च-बडेजाव टाळा, लग्नमंडपाचे राजकीय व्यासपीठ बनवू नका, कुंडलीऐवजी मुला-मुलींचे कर्तृत्व पाहा, शिवाजी महाराजांची आरती नको,प्रिवेडींग नको,ज्यांच्या कडे अमाप पैसा आहे त्यांनी आपल्या मुलामुलींच्या लग्नात दुसरे दहा लग्न लावावेत अशी आचारसंहिताच सकल मराठा समाजाने तयार केली आहे. मराठा समाजातील लग्न समारंभाची सर्वमान्य आचारसंहिता ठरवण्यासाठी सकल मराठा समाजाची सामूहिक बैठक सोमवारी ९ जून रोजी हनुमान मंगल कार्यालय, विजयनगर नांदेड येथे आयोजित करण्यात आली होती.मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष कामाजी पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सकल मराठा समाजाचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अवास्तव खर्चाला फाटा देत कमी खर्चात'दोनशे लोकांत लग्न लावा' असा एकमुखी ठराव च पारित करण्यात आला. वैष्णवी हगवणे या मराठा समाजातील विवाहित तरुणीने सासरच्या छळाला कंटाळून आत्महत्या केली. तिच्या वडिलांनी शाही थाटात विवाह लावला. सगळी धर्मकार्ये झाली. पण, या सगळ्या गोष्टी तिचा संसार नीट करू शकल्या नाहीत. हुंडा, कुंडली, ज्योतिष,



मंगलाष्टके, वऱ्हाडी, अक्षता हे कुणीही तिला वाचवू शकले नाही. पैसे उधळले, धर्मसोपस्कार केले, म्हणजेच लग्न टिकेल ही अंधश्रद्धा आहे, हे लोकांना कळले. असे मत व्यक्त करत उपस्थित प्रतिनिधींनी आपल्या भावना प्रकट केल्या. लग्न समारंभाची सर्वमान्य आचारसंहिता ठरवण्यात आली असून या आचारसंहि तेची सकल मराठा समाजा ने अमलबजावणी करावी असे आवाहन करण्यात आले. या आचारसंहितेची अमलबजावणी करण्यासाठी सुकानु समिती स्थापन करण्यात आली. या समिती मध्ये सोपानराव क्षीरसागर,मधूकर महाराज बारुळकर,विठ्ठल बनबरे,तानाजी हुस्सेकर,अवधुत पवार,संतोष गव्हाने, संकेत पाटील,सुचिता जोगदंड, कल्पना पाटील,माधवराव देवसरकर, पंढरीनाथ बोकारे,पंजाबराव काळे,गिरीष जाधव, पंडित कदम,रमेश पवार,जानार्धन शेजुळे,प्रवीण जाधव यांचा सूकानु समितीत समावेश आहे. डी जे वर बंदी घालणे, पारंपरिक वाद्य वाजवणारे लोक कलावंतांना प्रोस्थान देणे,प्री-वेडिंगमधून बिबित्स प्रकार दाखवू नये,नवरा-नवरीला हार घालताना वर उचलून घेऊ नये. कर्ज काढून लग्नात खर्च करु नये. नवरदेवापुढे, वरातीत दारू पिऊन नाचणाच्या तरुण-तरुणींना पायबंद घालावा. लग्नात फक्त वधूपिता आणि वरपिता यांनीच फेटे बांधावेत. लग्नात छ. शिवाजी महाराजांची आरती बंद करावी. आणि जिजाऊ वंदना घ्यावी. भेटवस्तूऐवजी पुस्तके, झाडाची रोपे भेट द्यावी. देखावा करू नये, लग्नात हुंडा - घेऊ नये,जेवणात पाचपेक्षा जास्त अन्न पदार्थ ठेवू नये. लग्न साखरपुडा हकद एकाच दिवसी करावा अशी लग्न अचारसहिंता तयार करण्यात आली आहे. या बैठकीला सौ.प्रणिता देवरे-चिखलीकर,एकनाथराव पावडे,तानाजी भोसले,संकेत पाटील,पंडितराव कदम, प्रा. संतोष देवराये,नानाराव कल्याणकर,उद्धवराव सूर्यवंशी,रमेश पवार,सुनिल कदम, दशरथ कपाटे ,सुभाष कोह्ले,प्रा.प्रभाकर जाधव, कृष्णा मंगनाळे ,डॉ रेखा चव्हाण सौ.विजयाताई लुंगारे, सुमित्राताई वडजकर, कल्पनाताई चव्हाण,डॉ विद्या पाटील,अंकुश कोह्ले,अशोक कदम,अविनाश पुयड,पिंटू पाटील,गंगाधर पवार,आनंद पाटील,रघुनाथ पवार,गजानन वाघ,माधव घोगरे,विश्वभर धोपटे,नवनाथ जोगदंड,,तूकाराम सूर्यवंशी,बालाजी सुर्यवंशी बालाजी ढगे,सुधार देशमुख,दत्ता भोसले,आनंद जाधव, सुरेश घोररबांड, यांच्यासह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com